# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २६४/२०२४ दिनांक:- १६/०७/२०२४.

## "हुंडयासाठी महिला व तिचे पोटातील बाळास औषध देवून ठार मारणारे नवरा व सावत्र मुलास ताब्यात घेण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश."

आचोळे पो.स्टे. गु.र.क्र. १६३/२०२४ भादविसक ३१५, ४९८(अ), ३४ प्रमाणे या गुन्हयातील मयत फिर्यादी यांचा आरोपी नामे जयप्रकाश अमरनाथ दुबे हा पती असुन आरोपी सचिन जयप्रकाश दुबे हा सावत्र मुलगा आहे. आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे याचे फिर्यादी सोबत लग्न झाल्यानंतर तिच्या घरच्यांनी लग्नामध्ये काही दिले नाही या कारणावरुन दारु पिऊन दररोज मारहाण करीत होता. दिनांक ०७/०४/२०२४ रोजी रात्रौ ०८.०० वाजता आरोपी जयप्रकाश दुबे यांनी दारु पिऊन फिर्यादी ही आठ महीन्याची गरोदर असताना सुध्दा तिस मारहाण केली व आरोपी सचिन दुबे याने फिर्यादीला पकडुन ठेवुन आरोपी जसप्रकाश दुबे याने कोणते तरी औषध पिण्याकरीता दिल्याने फिर्यादीचे पोटातील बाळ पोटामध्येच मयत झाल्याने दिनांक २०/०४/२०२४ रोजी नमुद गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयात पती जयप्रकाश अमरनाथ दुबे यास स्थानिक पोलीसांनी अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाचे आदेशाने जामीनावर मुक्त होता परंतु आरोपी सचिन जयप्रकाश दुबे हा स्थानिक पोलीसांना मिळुन येत नव्हता.

फिर्यादी ही स्टार हॉस्पीटल, नालासोपारा पश्चिम येथे उपचार घेत असताना दिनांक ०२/०७/२०२४ रोजी मयत झाल्याने सदर गुन्हयात भादविसक ३०२ हे कलम वाढवुन आरोपी जयप्रकाश अमरनाथ दुबे याचा जामीन रद्द होणेकामी पोलीसांनी न्यायालयात अहवाल सादर केला असता दिनांक ११/०७/२०२४ रोजी जामीन रद्द करण्यात आलेला होता. तेव्हापासून दोन्ही आरोपी पळून गेल्याने मिळुन येत नव्हते.

हुंडयासाठी पत्नी व तिच्या पोटातील बाळाची हत्या यासारख्या गंभीर व संवेदनशील गुन्हयातील आरोपी आरोपी मिळून येत नसल्याने मा. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ पाहीजे आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश केले होते. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख यांनी १) पोउपनिरी. हितेंद्र विचारे २)पोहवा. राजाराम काळे ३)पोहवा. शिवाजी पाटील ४)पोहवा. गोविंद केद्रे ५)पोहवा. हनुमंत सुर्यवंशी ६)पोहवा. संग्राम गायकवाड ७)पोहवा. संतोष मदने ८)पोशि. अकिल सुतार ९)पोशि. साकेत माघाडे १०)पोशि. नितीन राठोड असे तपास पथक तयार करुन त्यांना तात्काळ आरोपीच्या शोधार्थ रवाना केले. नमुद पथकाने सदर सलग ०४ दिवस अहोरात्र मेहनत घेवुन तपासात सातत्य ठेवून तांत्रीक तपास व गोपनीय माहितीचे

आधारे सापळा लावून पाहीजेत आरोपी नामे १)जयप्रकाश अमरनाथ दुबे, वय-४० वर्षे रा.रुम क्र. पी/७०१, विना डायनास्टीक बिल्डींग, एव्हरनाईन, नालासोपारा पुर्व,ता.वसई जि.पालघर २)सचिन जयप्रकाश दुबे, वय-२० वर्षे रा. सदर यांना नालासोपारा येथून दिनांक १६.०७.२०२४ रोजी शिताफिने ताब्यात घेतले असून त्यांचा नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना पुढील कारवाई करीता आचोळे पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री. अविनाश अंबुरे व सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनि. नितीन बेन्द्रे, दत्तात्रय सरक, पोउपनिरी. हितेंन्द्र विचारे, सहापोउपनिरी. श्रीमंत जेधे, पोहवा. राजाराम काळे, हनुमंत सुर्यवंशी, संतोष मदने, संग्राम गायकवाड, शिवाजी पाटील, गोविंद केद्रे, सतिष जगताप, मनोहर तावरे, आसीफ मुल्ला, राजविर संधु, प्रविणराज पवार, महेश वेल्हे, अनिल नागरे, पोशि. अखिल सुतार, नितीन राठोड, साकेत माघाडे, अंगद मुळे, मसुब सचीन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा यांनी यशस्वी कामगिरी केलेली आहे.

